दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ३२२ गुरूवार दि.२६ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण

मुंबई : प्रतिनिधी भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी जाहीर केली होती. इंदिरा गांधी यांच्या या निर्णयाला आज ५० वर्षे पूर्ण झाली. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वर्तमानपत्रामध्ये आणीबाणीच्या मुद्यावर लेख लिहिला आहे. या लेखात त्यांनी आणीबाणीवर टीका करत काही जुन्या कटू आठवणी सांगितल्या आहेत.



देशातील एका काळ्याकुट्ट अध्यायाला आज ५० वर्षे झाली. त्याला सुवर्णमहोत्सव म्हणायचे तरी कसे? महोत्सव हा चांगल्याचा करायचा असतो. त्यामुळे संविधान, संविधानिक व्यवस्था आणि लोकशाही पायदळी तुडवणा-या काँग्रेस पक्षाने लिहिलेल्या या अध्यायाला ५० वर्षे झाली, एवढेच म्हणावे लागेल. जुने दिवस कधी विसरायचे नसतात, ते सतत आपल्याला लढण्याचे बळ देत असतात, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली.

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिवंत असताना त्यांचा विचार कधी काँग्रेसने स्वीकारला नाही आणि आणीबाणीत तर त्यांनी दिलेल्या पवित्र संविधानावरच सूड उगवण्याची भूमिका घेतली. तीन लाखांवर लोकांना तुरुंगात टाकण्यात आले होते, अनेक संसार उघड्यावर आले होते. समाजवादी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ या आंदोलनात अग्रणी होते. या आणीबाणीच्या समर्थनार्थ केवळ दोनच पक्ष उभे झाले, त्यातील एक होता भाकप आणि दुसरी शिवसेना. माकपनेसुद्धा विरोधी भूमिका घेतली होती. या आणीबाणीने अनेक कुटुंबांना उद्ध्वस्त केले, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

अनेकांनी आपले आप्तस्वकीय गमावले. घरातील कमावती व्यक्ती कारागृहात असताना अनेक कुटुंबे कर्जबाजारी झाली. त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले. अनेकांची संपत्ती जप्त झाली, उद्योग-रोजगार कायमचे संपुष्टात आले. मानसिक आणि आर्थिक अशा दोन्ही पातळ्यांवर मोठे शोषण झाले. माझा वैयक्तिक अनुभव विचाराल, तर मी केवळ पाच वर्षांचा होतो. माझे वडील दि. गंगाधरराव फडणवीस यांनाही अटक झाली होती. त्यांना कारागृहात डबा द्यायला जाताना किंवा त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी नेताना फक्त भेट होत असे. लहान वयात वडिलांपासून बराच काळ दूर राहावे लागले. त्यामुळे मनातून चीड होती, अशी कटू आठवण देवेंद्र फडणवीसांनी सांगितली.

## 'शक्तिपीठ' महामार्गाविरोधात शेतक-यांचा संताप



मुंबई : नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सरकारने हा प्रकल्प राबवण्यास तब्बल २० हजार ७८७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सरकारच्या या निर्णयानंतर आता हा महामार्ग ज्या-ज्या जिल्ह्यांतून जात आहे, त्या भागातील शेतकरी चांगलेच आक्रमक झाले आहेत. परभणी, नांदेड, हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी प्रचंड आक्रमक झाले आहेत. नांदेडमध्ये शेतक-यांनी या महामार्गाच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन केले आहे.

नांदेडच्या मालेगाव येथे शेतक-यांनी एकत्रित बोंबाबोंब आंदोलन केले. यावेळी शक्तिपीठ महामार्गाच्या अनुषंगाने काढलेल्या शासन निर्णयाची होळी करण्यात आली. सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट, आमच्या लेकरा बाळांना ड्रीम नाहीत का? यावेळी शक्तिपीठ महामार्गबाधित शेतक-यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. जमिनीची मोजणी करायला आलेल्या अधिका-यांना मारू नाही तर मरू असा आक्रमक पवित्रा शेतक-यांनी घेतला.

महामार्गाच्या विरोधात शेतक-यांमध्ये प्रचंड रोष पाहायला मिळत आहे. आज (२५ जून) नांदेड, परभणी व हिंगोली येथील शक्तिपीठ महामार्गबाधित शेतक-यांनी एकत्र येऊन बैठक घेतली. बैठकीनंतर सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करून शक्तिपीठ महामार्गाच्या अनुषंगाने काढलेल्या शासन निर्णयाची शेतक-यांनी होळी केली. आमची वडिलोपार्जित जमीन जात असेल तर आम्हाला हा शक्तिपीठ मार्ग काय कामाचा? असा सवाल शेतक-यांनी उपस्थित केला.

एक इंचही जमीन देणार नाही

शक्तिपीठ महामार्गाला आम्ही एक इंचही जमीन देणार नाही, असा निर्धारसुद्धा यावेळी शेतक-यांनी केला आहे. तसेच मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या विरोधात शेतक-यांनी जोरदार घोषणाबाजी करून या शक्तिपीठ महामार्गाला विरोध दर्शवला आहे.

## किरीट सोमय्यांनी मशिदीत जाऊ नये; भोंग्याच्या मुद्द्यावरून अजित पवारांच्या कडक शब्दात सूचना

मशिदींवरील अनधिकृत भोंग्यांचा मुद्दा आता पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिम शिष्टमंडळाची बैठक पार पडली. मशिदींवरून जबरदस्तीने भोंगे उतरवले जात असल्याचा आरोप यावेळी मुस्लिम संघटनांनी केला आहे. तर किरीट सोमय्या यांच्या दबावामुळे पोलीस कारवाई करत असल्याचा दावा ही मुस्लिम संघटनांकडून करण्यात आला आहे.

मुस्लिम संघटनांनी स्पष्टपणे सांगितलं की, जर किरीट सोमय्या यांच्याकडून पोलिसांवर दबाव टाकून कारवाई करण्यात आली तर कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण होईल आणि याला किरीट सोमय्या जबाबदार असतील. याप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी किरीट सोमय्यांना मशिदीत जाऊ नये, त्यांच्या मशिदीत जाण्यामुळे कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे उपमुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, किरीट सोमय्या हे काही ठिकाणी मशिदीत जात असल्याचे समोर आले होते. मशिदीवरील भोंग्यासंदर्भात सोमय्या यांनी यापूर्वी सुद्धा आंदोलन केले होते.






## पत्रकार भवन बचाव मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याला यश

यशस्वी तेव्हांच होईल, जेव्हां सध्याचे खिंडार अवस्थेत असलेले सीवूड्स येथील सिडको पत्रकार भवनांचे पुनर्नूतनीकरण करून त्याचे लवकरात लवकर उद्घाटन लोकार्पण सोहळा शासनाच्या वतीने केले जाईल, तेंव्हा कुठेतरी सर्व पत्रकारांचे समाधान झाले असे म्हणता येईल, अन्यथा पुढील महिन्यात सर्व नवी मुंबई पत्रकारांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल..!





नवी मुंबई / के. एच. हनवते :- सिडको निर्मित सिवुड्स येथील पत्रकार भवनाची तयार इमारत माहिती जनसंपर्क विभागाला देण्याचा निर्णय झाल्याने याला नवी मुंबई शहरातील पत्रकारांनी तीव्र विरोध केला होता. वेळ पडल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा सिडको प्रशासनास देण्यात आला होता. या अनुषंगाने वनमंत्री गणेश नाईक यांच्या बरोबर झालेल्या बैठकीत वस्तूस्थिती विषद करण्यात आली. या बैठकीला नवी मुंबईतील सव्वाशे पेक्षा अधिक पत्रकार उपस्थित होते. पत्रकारांच्या भावना समजून घेत यावर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन गणेश नाईक यांनी दिले होते. या अनुषंगाने वनमंत्री गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बरोबर लावलेल्या बैठकीत पत्रकार भवनाचा मुद्दा उपस्थित केला होता. या बैठकीला पत्रकार विनायक पाटील, विनय म्हात्रे, जयेश सामंत, प्रवीण पुरू, मनोज जालनावाला उपस्थित होते. पत्रकारांच्या मागणीमुळे सिडकोने ही इमारत उभा केली आहे. नवी मुंबईतील पत्रकारांचे हे हक्काचे भवन आहे. त्यामुळे सिडकोने ते परस्पर राज्य सरकारच्या माहिती जनसंपर्क विभागाला देणे चुकीचे असल्याचे लक्ष्यात आणून दिले. यावर मुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पत्रकार भवन हे नवी मुंबईतील पत्रकारांना दिले जाईल असे स्पष्ट केले. त्यामुळे सिडकोने ते महापालिकेला द्यावे असे आदेश दिले. महापालिका आयुक्त डॉ कैलाश शिंदे यांनी ही इमारत महापालिका हस्तांतरित करून घेवून तिची योग्य ती डागडुजी करू असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे पत्रकार भवनाचा दुसरा टप्पा यशस्वीपणे पार पडला असून जोपर्यंत पत्रकार भवन प्रत्यक्षात ताब्यात येत नाही तोपर्यंत लढा सुरू ठेवायचा आहे. या मोहिमेत सुरुवातीपासून पत्रकारांनी सक्रिय भूमिका घेतली. याबद्दल नवी मुंबई शहरातील लढवय्या पत्रकारांचे शतशः आभार . याच बरोबर वन मंत्री गणेश नाईक यांनी शासन दरबारी पत्रकारांच्या भूमिकेची योग्य मांडणी केल्याबद्दल त्यांचेही खूप खूप आभार... नवी मुंबई शहरातील सर्व पत्रकारासाठी हे भवन लवकरात लवकर खुले होईल एवढीच शासनाकडून अपेक्षा.

## अमरावती जिल्हा बँक प्रकरण : बच्चू कडू यांना मोठा दिलासा; म्हणाले, सत्याचा विजय

प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या अपात्रता निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे बच्चू कडू यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच बच्चू कडू यांचे जिल्हा बँकेचे अध्यक्षपद कायम राहणार आहे. १६ जून रोजी बच्चू कडू यांना अपात्र ठरवण्यात आले होते.



उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, न्यायालयाने अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून दिलेला निर्णय हा सत्याचा विजय आहे. जिल्ह्यातील काही काँग्रेस नेते भाजपचे स्लीपर सेल म्हणून काम करीत आहेत. भाजपच्या मदतीने त्यांनी बँकेतून आम्हाला हटविण्याचा प्रयत्न केला. परंतु न्यायदेवतेने न्याय केला आहे.

नेमकं काय आहे प्रकरण? नाशिक येथील एका आंदोलनप्रकरणी २०१७ मध्ये बच्चू कडू यांच्याविरुद्ध सुकरवाडा पोलिस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणि मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात न्यायालयाने त्यांना एक वर्षाची शिक्षा सुनावली होती. अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नियमांनुसार, संचालकाला न्यायालयाकडून एक वर्षापर्यंतची शिक्षा झाल्यास तो पदावर राहू शकत नाही. याच मुद्द्याला धरून बँकेतील विरोधी गटातील बारा संचालकांनी हरिभाऊ मोहोड यांच्या नेतृत्वाखाली बच्चू कडू यांना अपात्र ठरविण्याची मागणी केली होती. सहकार विभागाचे विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी विरोधी गटाच्या तक्रारीची दखल घेत बच्चू कडू यांना नोटीस बजावली होती.

## कोल्हापुरातील २२ माजी नगरसेवक शिंदेसेनेत

कोल्हापूर : कोल्हापूर महानगरपालिकेतील काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप, ताराराणी आघाडी या चारही पक्षांतील २२ माजी नगरसेवकांनी मंगळवारी मुंबईत झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदेसेनेत प्रवेश केला.

पक्षप्रवेश केलेल्यांमध्ये काँग्रेसच्या शारंगधर देशमुख यांच्यासह तीन माजी महापौर, स्थायी समितीचे दोन माजी सभापती यांचा समावेश आहे.



सत्ता आणणारे किंगमेकर शिंदेसेनेत आल्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा निश्चित फडकेल, असा विश्वास व्यक्त करतानाच कोल्हापूर शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

माजी नगरसेवकांनी प्रवेश केल्यामुळे शिवसेनेची ताकद वाढली आहे. त्यामुळे येथून पुढे कोल्हापूरचा विकास हाच अजेंडा घेऊन काम करू. एक कार्यकर्ता असल्याने सर्वसामान्य जनतेला सेवासुविधा देण्यासाठी मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी माजी आमदार जयश्री जाधव, सत्यजित कदम यांच्यासह माजी नगरसेवक उपस्थित होते. माजी नगरसेवकांनी करेक्ट कार्यक्रम केला आहे. पहिल्या दणक्यातच खटक्यावर बोट ठेवून जाग्यावर पलटी केलंत. यापुढे अजून अनेक कार्यक्रम करायचे आहेत, हे लक्षात ठेवा. आपणाला महापालिका जिंकायची आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्हा शिवसेनामय- आबिटकर

कोल्हापुरात आता पूर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तर असे सगळेच चित्र शिवसेनेचे होईल. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वच निवडणुका ताकदीने लढवूया. मला विश्वास आहे उपमुख्यमंत्री शिंदे आपल्या सगळ्या प्रश्नांना ताकद देतील, अशी अपेक्षा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली.

# संपादकीय

## टेलर स्विफ्ट

सध्या अमेरिकन गायिका आणि गीतकार टेलर स्विफ्ट जागतिक संगीत क्षेत्रात चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. कारण, काही दिवसांपूर्वी तिने संपूर्ण युरोपमध्ये काढलेल्या 'ईरास टूर' या संगीत दौर्‍यातून तिला अब्जावधी रुपयांची प्राप्ती झाल्याच्या बातम्या विदेशी प्रसार माध्यमांतून मोठ्या प्रमाणात येत आहेत. त्यामुळे इतकी प्रचंड कमाई करणारा कदाचित तिचा हा जगातील पहिलाच संगीत दौरा असावा, असे बोलले जात आहे. लंडन, पॅरिस, व्हिएन्ना आणि बर्लिनसारख्या शहरांमधील तिच्या कार्यक्रमांची तिकिटे उपलब्ध झाल्या झाल्या काही वेळातच हातोहात संपली होती.

यामुळे केवळ तिच्या संगीत कौशल्याचाच नाही, तर जागतिक लोकप्रियतेचाही पुनः प्रत्यय आला होता. तिने या टूरमध्ये तिच्या कारकिर्दीतील विविध संगीत कालखंड (ईरास) दाखवले, जे चाहत्यांना मनापासून आवडले. याशिवाय अलीकडेच अमेरिकन फुटबॉल खेळाडू ट्रॅविस केल्सी सोबत तिचे नाव जोडले गेल्याने जगभरातल्या गॉसिप स्टोरीजमध्ये ती पुन्हा एकदा झळकली. अशा या म्युझिक क्वीन टेलर स्विफ्टचा जन्म १३ डिसेंबर १९८९ रोजी अमेरिकेतील पेनसिल्व्हेनिया राज्यातील रीडिंग या शहरात झाला. लहानपणापासूनच संगीत आणि लेखनाची आवड असल्यामुळे तिने किशोरवयातच गीते लिहायला सुरुवात केली. तिचा पहिला अल्बम 'टेलर स्विफ्ट' २००६ मध्ये प्रदर्शित झाला आणि त्यातील 'टिम मॅकग्रा' हे गाणं लोकप्रिय ठरलं. त्यानंतर 'फिअरलेस', 'स्पीक नाऊ', 'रेड, नाईन्टीन एटीनाईन', 'रिप्युटेशन', 'लव्हर, फोकलोर', 'एव्हरमोर' आणि 'मिडनाईटस्' या अल्बमनी तिला यशाच्या शिखरावर पोहोचवलं.

टेलर ही फक्त गायिका नसून एक प्रतिभावान गीतकारही आहे. तिची गाणी प्रेम, विरह, आत्मसन्मान आणि सामाजिक जाणिवांवर आधारित असतात. ती अनेकदा तिच्या वैयक्तिक आयुष्यातील अनुभवांना गाण्यांतून मांडत असते. यामुळे तिचे चाहते तिच्याशी भावनिकदृष्ट्या जोडले जातात. तिच्या संगीतशैलीत पॉप, रॉक आणि इंडी अशा विविध शैलींचा समावेश आहे. तिच्या कारकिर्दीत तिला ग्रॅमीसह अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून ती 'टाईम' मॅगझीनच्या '१०० मोस्ट इन्फ्लुएन्शियल पीपल' यादीत अनेक वेळा झळकली आहे. व्यावसायिक यशाबरोबरच ती सामाजिक विषयांवरही स्पष्ट भूमिका घेते.

महिलांच्या हक्कांपासून ते एलजीबीटी समुदायासाठीच्या समर्थनापर्यंत तिने आपल्या मंचाचा वापर सामाजिक परिवर्तनासाठी वेळोवेळी केला आहे. काही दिवसांपूर्वी युरोपमध्ये पार पडलेली तिची बहुचर्चित 'ईरास टूर' ही तिच्या संपूर्ण कारकिर्दीचा संगीत उत्सव होती. ही टूर केवळ संगीतप्रेमींसाठी नाही, तर जागतिक पॉप संस्कृतीसाठीही एक ऐतिहासिक पर्व ठरली आहे. या दौर्‍यामुळे टेलर स्विफ्ट ही केवळ एक युरोपियन पॉपस्टार नसून एक जागतिक कीर्तीची कलाकार असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस सणाप्रमाणे साजरा करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

आपण सर्वांना ज्ञात आहे की, २६ जून १८७४ ला कागलचे जहागिरदार जयसिंगराव आबासाहेब घाडगे व राधाबाई यांच्या पोटी यशवंतराव यांचा जन्म झाला. ते दहा वर्षांचे असताना कोल्हापूर चे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई यांनी १८ मार्च १८८४ ला दत्तक घेतल्याने पुढे कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहू महाराज झाले. २ एप्रिल १८९४ ला शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली. १९०१ मध्ये त्यांनी विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूरात व्हिक्टोरिया बोर्डिंग स्थापन केली होती. २६ जुलै १९०२ ला आपल्या संस्थानात मागासवर्गीयांना पन्नास टक्के आरक्षण लागू केले होते. तसेच अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी १९०७ ला 'मिस क्लार्क बोर्डिंग' वस्तीगृह सुरू केले होते. बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी १९१६ मध्ये डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली होती. १९ ते २१ एप्रिल १९१९ दरम्यान उत्तर प्रदेश राज्यातील कानपूर शहरात शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली भारतीय कुर्मी क्षत्रियांची परिषद भरविण्यात आली होती. ज्यात बहुजनांच्या हितासाठी पहिल्या दिवशी आपले मत व्यक्त केले होते. परिषदेच्या शेवटच्या दिवशी म्हणजे २१ एप्रिल ला शाहू महाराजांना 'राजर्षी' पदवी बहाल करण्यात यावी, असा सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला होता.




शाहू महाराजांच्या कार्याविषयी बोलताना २१ व २२ मार्च १९२० ला संपन्न झालेल्या माणगाव परिषदेची महानता विषद करने अगत्याचे ठरते. सदरील परिषदेत सहभागी होण्यासाठी कुळकर्णी, तलाठ्याकडून बहिष्कृतांना थांबविण्यासाठी गैरसमज पसरविण्यात आले होते. या परिषदेस कोल्हापूर दरबारातील हितचिंतक व वरिष्ठ दर्जाची मंडळी उपस्थित होती. तसेच ब्राह्मण गृहस्थ सुद्धा उपस्थित होते मात्र डिप्रेस्ड क्लास मिशन व बहिष्कृतांच्या हितासाठी झटणाऱ्या कोणत्याही संस्थेचे एक पिसू देखील हजर नव्हते. तरीही ५ हजारावर जणसमुदाय उपस्थित होता. स्वागत समितीचे अध्यक्ष दादासाहेब राजेसाहेब इनामदार हे म्हणाले होते की, इतर लोक आपले भले करतील असे समजून त्यांच्यावर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्या समाजोद्धाराचे महत्कार्य आपण स्वतःच केले पाहिजे.

तत्कालीन परिस्थितीचे अवलोकन केले असता जन्मसिद्ध योग्य योग्यता व पवित्र पवित्रतेच्या आधारावर हिंदू लोकांची विभागणी केली तर तीन वर्ग तयार होतात. पहिले म्हणजे जन्माने सर्वात श्रेष्ठ व पवित्र ज्यांना आपण ब्राह्मण म्हणतो. दुसरे म्हणजे ज्याची जन्मसिद्ध श्रेष्ठता व पवित्रता ब्राह्मणापेक्षा कमी दर्जाची आहे असा जो वर्ग म्हणजे ब्राह्मणेतर वर्ग होय. तर तिसरे म्हणजे जे जन्मसिद्ध कनिष्ठ व अपवित्र अशांचा जो वर्ग म्हणजे आपला बहिष्कृत वर्ग होय. अशा क्रमिक विषमतेवर आधारित जन्मसिद्ध श्रेष्ठता व पवित्रतेमुळे गुणहीन ब्राह्मणांचे देखील कल्याण झाले आहे. ब्राह्मणेतर धन, द्रव्यापासून दूर असले तरी त्यांना ते मिळविण्याचे मार्ग मोकळे होते. मात्र बहिष्कृतांना कायमचे वंचित करण्यात आले होते. ज्यांच्यातील आत्मबल व स्वाभिमान लोप पावला होता. त्यांना धनसंचयाचे मार्ग म्हणजे व्यापार, नौकरी व शेती या पासून वंचित ठेवण्यात आले होते. जन्मसिद्ध अयोग्यता व अपवित्रतेमुळे आर्थिक दृष्ट्या ते विकलांग झाले होते. यात सुधारणा होण्यासाठी राजकीय सामर्थ्य संपादित करणे आवश्यक होते. ज्यासाठी जातवार प्रतिनिधित्व बहाल करणे गरजेचे होते. ज्यात 'सत्य मेव जयते' हे तत्त्व पोकळ असल्याचे स्पष्ट करून सत्याचा विजय होण्यासाठी आपण आपली चळवळ निरंतर पणे चालविली पाहिजे. असे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केले होते.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांच्या भाषणाचा लाभ मिळावा म्हणून जाणीवपूर्वक उपस्थित असल्याचे जाहीर केले होते. याप्रसंगी शाहू महाराजांनी मि. आंबेडकर सर्व मागासलेल्या जातींचा परामर्श घेतात म्हणून त्यांचे अभिनंदन केले होते. तसेच महार, मांग, चांभार, ढोर हे वैश्य जातीचे असून सुद्धा त्यांना अस्पृश्य, अतिशूद्र कुणी ठरविले असेल? असा प्रश्न उपस्थित केला होता. आपली ही दुरावस्था होण्याचे प्रमुख कारण म्हणजे आपणास योग्य पुढारी नसणे हे होय. आपल्यातील काही स्वार्थी मंडळी अयोग्य पुढारी नेमून अज्ञानी जनतेची फसवणूक करतात. पशू, पक्षी सुद्धा आपल्याच जातीचे पुढारी निवडतात. गाय, बैल, मेंढरे यात मात्र धनगर त्यांचा पुढारी असतो म्हणून शेवटी त्यांना कत्तलखान्यात जावे लागते. नेतृत्वा अभावी तशीच अवस्था आपल्या समाजाची झाली आहे. परिणामी दिवसेंदिवस आपल्या समाजावर होणारे अन्याय अत्याचार वाढतच चालले आहेत. आर्य, बुद्ध, ख्रिस्तांनी त्यांना आनंदाने आपल्यात सामावून घेतले असते. परंतु ते तिकडे गेले नाहीत कारण त्यांना तुमचा म्हणजे अस्पृश्यांचा उद्धार करायचा होता. करिता त्यांनी डॉ. आंबेडकरांचे व ज्या जनतेने डॉ. आंबेडकरांना आपला पुढारी म्हणून स्विकार केला होता त्या जनतेचे सुद्धा आभार व्यक्त केले होते. पुढे ते म्हणाले की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे! तर अशी वेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. अशी माझी मनोदेवता मला सांगते.

नंतर परिषदेत एकूण १५ ठराव मंजूर करण्यात आले होते. ज्यात १) ब्रिटिश सरकारसह दोस्त राष्ट्रांना विजय मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला होता. २) श्रीमन्महाराज छत्रपती सरकार इलाखा करवीर यांनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे अधिकार देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कार्य सुरू केल्यामुळे त्यांचा जन्म दिवस प्रत्येक व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा असे ठरविण्यात आले होते. ३) बहिष्कृतांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणा-या राजे, महाराजे व संस्थानिकांचे आभार व्यक्त करण्यात आले होते. ४) बहिष्कृत लोक हे हिंदी साम्राज्याचे घटक असल्याने त्यांना सार्वजनिक रस्ते, विहिरी, तलाव, शाळा, धर्मशाळा, भोजनगृहे, वाहने इत्यादी सोयींचा उपभोग घेण्याचा तसेच योग्यतेनुसार व्यापार करण्याचा व नौकरी मिळविण्याचा हक्क आहे. ५) लिंगभेद न करता प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे करण्यात यावे. ६) विद्यार्जनासाठी बहिष्कृतांना शिक्षणाचे सर्व मार्ग खुले करण्यात यावेत. जे कार्य बहिष्कृतांतील अधिका-यांमार्फत राबविले जाणे अपेक्षित होते. ७) बहिष्कृत वर्गातील विद्यार्थ्यांना मुसलमान व ब्राह्मणेतरांप्रमाणे शिष्यवृत्त्या मिळाव्यात, अशी मागणी करण्यात आली होती. ८) सर्वत्र स्पृश्य व अस्पृश्यांच्या शाळा एकत्र असाव्यात. ९) महार वतनदारांना गलिच्छ कामे करावी लागत असल्याने व वतनी जमिनीचे बारीक तुकडे पडत चालल्याने सदर पद्धतीत बदल करणे अपेक्षित होते. १०) कोणत्याही जातीच्या व्यक्तीने मृत जनावरांचे मास खाने हा गुन्हा आहे, असे कायद्याने मानले जावे. ११) तलाठ्याच्या जागांवर बहिष्कृत वर्गाच्या नेमणूका करण्यात याव्यात. १२) बहिष्कृत वर्गाच्या उन्नतीकरिता झटणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे आभार व्यक्त करण्यात आले. १३) भावी कायदे कौन्सिलात बहिष्कृतांचे प्रतिनिधी स्वतंत्र मतदारसंघातून लोकसंख्येच्या प्रमाणात निवडण्यात यावेत. १४) आप्पा दादा गौडा पाटील सह परिषदेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम करणा-या सर्व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले होते. १५) सदरील सर्व ठराव संबंधित अधिका-याकडे पाठविण्याची जबाबदारी अध्यक्षांकडे सोपविण्यात आली होती. तरी यातील कोणत्या ठरावाची पूर्तता झाली? आणि कोणत्या ठरावाची पूर्तता होऊ शकली नाही? याची वर्तमान प्रासंगिकता व उपयोगिता लक्षात घेऊन समाजमन तयार करण्यासाठी विचारांचा प्रचार प्रसार केला पाहिजे.

३० मे ते १ जून १९२० दरम्यान कस्तूरचंद पार्क नागपूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्क मागणीच्या पार्श्वभूमीवर बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. १९१७ मध्ये भारतमंत्री माँटेग्यू हिंदुस्थानात आले असता अस्पृश्य समाजाच्या वतीने डिप्रेस्ड क्लास मिशन अंतर्गत नारायण चंदावरकर आणि वि. रा. शिंदे यांच्या शिष्टमंडळाने आपल्या राजकीय मागण्या संदर्भात भेट घेतली होती. डिप्रेस्ड इंडिया असोसिएशन मार्फत गणेश अक्काजी गवई आणि किसन फागुजी बनसोडे यांनी निवेदन सादर केले होते. पुढे १९१९ मध्ये साऊथबरो कमिटी हिंदूस्थानात आली ज्यात हिंदी पुढा-यांनी होमरूल अर्थात स्वराज्याची मागणी केली होती. वि. रा. शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशन मार्फत 'अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व न देता त्यांचे हित संरक्षण उच्च वर्णीय हिंदू प्रतिनिधींच्या हाती सोपवावे असे स्पष्ट केले होते. तर २६ जानेवारी १९१९ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी टाईम्स मध्ये – चरहरी`प केश ठीश्रश अर्थात स्वराज्यात महारांचे स्थान यावर प्रकाश टाकण्यात आला होता. ज्यात स्पष्ट करण्यात आले होते की, 'हे हिंदू लोक स्वतःच्या घरातील घाण साफ करून टाकायला अजून तयार नाहीत तर त्यांनी स्वराज्य का मागावे? अशाप्रकारे कमिटी समोर वि. रा. शिंदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची मागणी भिन्न दृष्टीकोनातून मांडली. ज्यात आपले म्हणणे पटवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यशस्वी झाले. परिणामी पुढील काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व समाजाने स्विकारले. अशाप्रकारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या अपेक्षांच्या स्वप्नपूर्ती साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या नेतृत्वाचा सदुपयोग केला. करिता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना विनम्र अभिवादन करून मी माझ्या शब्दाना विराम देतो.

********

लेखक : बी. बी. मेश्राम, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.
संपर्क : ८०५५७३३०६७ (थह), ९४२१६७८६२८ (उ)

# सामाजिक न्यायाचे प्रणेते : राजर्षी शाहू महाराज

तथागत गौतम बुद्धांचा जन्म इसवी सन पूर्व ५६३ मध्ये झाला. त्यांनी बुद्धत्व प्राप्ती ते निर्वाणा पर्यंत सुमारे ४५ वर्ष ,देशभर धम्माचा प्रचार प्रसार केला. त्यांनी शील, समाधी आणि प्रज्ञा या त्रीवर आधारित विचारधारा समाजामध्ये रुजवली. त्यामुळे जातिभेद, कर्मकांड आणि अंधश्रद्धा मुक्त समाज निर्मिती झाली. तथागतांच्या धम्माचा प्रभाव हा, भारतामध्ये इसवी सनाच्या बाराव्या शतकापर्यंत कायम राहिला. त्यामुळे भारतात अनेक बौद्ध धम्माचे पालन करणारे राजवंश निर्माण झाले. विशेष म्हणजे नालंदा, विक्रमशीला, तक्षशिला यासारख्या बौद्ध विद्यापीठांनी भारताला ज्ञानाचे जागतिक केंद्र बनवले.

हळूहळू ब्राह्मणवादी, वैदिक पुनरुत्थानामुळे बौद्ध धम्म हळूहळू मागे पडला. त्यांनी येथील बौद्ध समाजाला जात ,धर्म ,वंश या व्यवस्थेच्या माध्यमातून बंधनात अडकून ठेवले. शिक्षण बंदी, सामाजिक ,आर्थिक बंदी लादल्याने हा समाज गरीबी, अन्याय-अत्याचाराच्या खाईत लोटला गेला .तरी देखील या बहुजन समाजामध्ये तथागतांच्या समता ,अहिंसा या तत्त्वाचा प्रभाव अदृश्य रुपात कायम राहिला .याचाच अर्थ भारतामध्ये बुद्धांचा प्रभाव हा सुमारे १५०० वर्ष सक्रिय होता. त्यानंतर निर्माण झालेल्या वर्णव्यवस्था आणि जात मूलक समाज व्यवस्थेमुळे हे बुद्धांचे विचार मागे मागे पडू लागले. त्यामुळे बहुजन समाजाचे आणि एकंदरीत देशाचे अतोनात नुकसान झाले. जो देश विश्वात अग्रेसर होता. तो देश दारिद्र्य, दैन्य अन्याय,अत्याचाराने व्यापला गेला. ही व्यवस्था एवढी भयंकर होती की, तिने माणसाचे जीवनच उध्वस्त केले. माणूस माणुसकीला पारखा झाला.

ही व्यवस्था आजही आहे. ही व्यवस्था जर उलथवून लावायचा असेल ;तर यावर एकमेव उपाय म्हणजे बहुजन वर्गाने शिक्षित झाले पाहिजे. यासाठी महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी, प्रयत्नांची पराकाष्टा केली. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, यासाठी वस्तीगृहे सुरू केली. समाजातील विषमता निर्मूलनासाठी शिक्षण गरजेचे होते .समाज जातिनिहाय विभागलेला होता. बहुजन समाज (म्हणजे शूद्र, अतिशूद्र, दलित व इतर मागासवर्गीय) शिक्षणापासून वंचित होता.शाहू महाराजांनी या सामाजिक विषमतेवर प्रहार करून, सर्वांना समान संधी मिळावी यासाठी शिक्षण हवेच, असे मानले.शाहू महाराज मानत की,शिक्षणाशिवाय प्रगती नाही. शिक्षणामुळे व्यक्ती विचार करू शकते, आपले हक्क समजून घेते, अन्यायाविरुद्ध उभी राहू शकते. त्याकाळी शिक्षणावर वैदिक लोकांचा एकाधिकार होता. शाहू महाराजांनी बहुजन समाजाला शिक्षण देऊन त्या वर्चस्वाला आव्हान दिले. यातून न्याय्य समाजरचना निर्माण करणे त्यांचे ध्येय दिसून येते. सर्व जातींना, वर्गांना शिक्षण, नोकरी, सन्मान मिळावा, गरिबांना वर यायची संधी मिळावी, सर्वांना स्वनिर्भर व सुशिक्षित बनवणे हे त्यानी आपले ध्येय बनवले. शाहू महाराजांची काही महत्त्वाची पावले उचलली . सर्वांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण केले. मराठा समाजासहित , बहुजनांसाठी शाळा, वसतिगृहे स्थापन केले.शिष्यवृत्ती योजना राबवून प्रोत्साहन दिले. जे शेतकरी मुलांना शाळेत पाठवणार नाहीत ,त्यांना एक रुपया दंड, असा आदेश काढून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा एकमेव राजा.शिक्षण म्हणजे शोषितांची शक्ती !हे जाणून शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे उघडली. त्यामुळेच ते सामाजिक न्यायाचे पितामह म्हणून ओळखले जातात. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या मुलांना शिक्षण देऊन, त्याकाळी सामाजिक व्यवस्थेला आव्हान दिले. शाहू महाराजांच्या या प्रगतिशील आणि शैक्षणिक कार्याला या व्यवस्थेच्या निर्मिकानी विरोध केला. कारण त्यांच्या वर्चस्वाला हे थेट आव्हान होते. ते सामाजिक सुधारणा ऐवजी, जुन्या चालीरीती, जातीभेद महत्त्वाचे मानत होते. त्यांच्यासाठी व्यवस्था टिकणे महत्त्वाचे होते. त्यामुळे त्यांनी शाहू महाराजांच्या कार्याला, ' धार्मिक परंपरेचा भंग' असे म्हणून विरोध केला. त्यांच्या निर्णयावर तीव्र शब्दात टीका केली. अनेक जण बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शाळेत घेण्यास तयार नव्हते; तर दुसरीकडे शाहू महाराजांच्याच व्यवस्थापनामध्ये काम करणारे, काही लोक शाहू महाराजांचे शैक्षणिक निर्णय अमलात आणण्यास टाळाटाळ करत होते. त्याचबरोबर शाहू महाराजांच्या निर्णयांना विरोध करून, त्यांची बदनामी करण्याचे ही प्रयत्न करत होते. मात्र शाहू महाराजांनी या विरोधाला न जुमानता स्पष्टपणे सांगितले की; शिक्षणावर एकाधिकार कोणाचाही असू नये. शिक्षण हे सर्वांचा मूलभूत हक्क आहे. असे सांगून शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडवली. त्यांच्यामुळे आजच्या भारताचा बहुजन समाजाच्या शिक्षणाचा पाया मजबूत झाला. शाहू महाराजांचे कार्य आजच्या परिस्थितीतही, भारतीय समाजाच्या अनेक समस्यांवर उपाय ठरताते. सामाजिक न्यायाला विरोध करणारे लोक आजही भारतात आहेत. आजही आपल्याला देशात, जाती अधिष्ठित विषमता ,अस्पृश्यता, भेदभाव, शैक्षणिक आणि सामाजिक असमतोल आढळतो. शाहू महाराजांनी सर्वांना समान न्याय, सन्मान आणि संधी या मूल्यांची उभारणी केली. सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी ही मूल्य आजही महत्त्वाची ठरतात. त्यांनी बहुजन समाजाला मोफत सक्तीचे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण सुरू केले. त्याचबरोबर आर्थिक दृष्ट्या दुर्बल अल्पसंख्यांक घटकानाही शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाज हा मुख्य प्रवाहात कसा येईल? त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शाहू महाराजांनी त्यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण लागू केले. शैक्षणिक आणि नोकरीच्या संधी दिल्या. सामाजिक न्यायासाठी ही विशेष बाब होती. त्यांनी त्या काळातही महिलांच्या सशक्तीकरणासाठी देखील प्रयत्न केले होते. शाहू महाराजांनी आपले कार्य करत असताना विरोध असतानाही कोणताही धर्म द्वेष केला नाही ;पण अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीभेद याला मात्र त्यांनी विरोध केला आणि धर्मनिरपेक्षता आणि विवेक वाद हा दृष्टिकोन किती आवश्यक आहे? हे त्यांनी आपल्या कार्यातून लोकांना दाखवून दिले. त्यामुळे शाहू महाराज हे केवळ ऐतिहासिक न राहता आजच्या सामाजिक शैक्षणिक आणि आर्थिक सुधारण्याच्या प्रक्रियेतील एक आदर्श आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या विचारामुळेच भारताच्या समतेच्या आणि न्यायाच्या लढ्याला बळ प्राप्त होते. शाहू महाराज हे परिवर्तनाचे अग्रदूत ठरतात. कारण ते पहिले राजा आहेत, ज्यांनी सरकारी पातळीवर शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण लागू केलं .त्यांनी समाजातील सर्व घटकांना शाळेत प्रवेश देणे सुरू केलं. वस्तीगृह तयार करून ,क्रांतिकारक पाऊल टाकलं .त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सहकार्य करून न्याय मिळवून देणारा एक महत्त्वाचा नेता उभा करण्यासाठी पाठिंबा दिला. व्यवस्थेतील काही लोकांनी शाहू महाराजांविषयी पसरवलेले गैरसमज, केलेला अपप्रचार यामुळे बहुजन समाज शाहू महाराजांच्या कार्याकडे काही अंशी दुर्लक्ष करतो. यामागे सामाजिक ,ऐतिहासिक आणि मानसी कारणे हे आहेत. आजही शालेय किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमामध्ये शाहू महाराजांच्या कार्याची सखोल माहिती दिली जात नाही. त्यांच्या कार्याकडे केवळ स्थानिक राजे म्हणून पाहिले जाते. बहुजन समाज आजही दैनंदिन संघर्षात अडकलेला आहे. शिक्षण, रोजगार ,अन्याय यांना तो सामोरे जात आहे. त्याचबरोबर इतिहास व प्रेरणादायी नेत्यांबद्दल विचार करण्यासाठी वेळ , साधने आणि जागृतता बहुजन समाजामध्ये फारशी आलेली नाही .बहुजन समाजाचा खरा आधार हे शाहू राजे आहेत. हे बहुजन समाजातील तळागाळापर्यंत अजून पोहोचलेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, की आपण इतिहास विसरलो; तर नवा इतिहास घडू शकत नाही. म्हणजेच आम्ही आमचं भविष्य गमावून बसतो .यासाठी बहुजन समाजाने शाहू महाराजांचा समतेचा ,सामाजिक न्यायाचा विचार, त्यांचा संघर्षाचा इतिहास समजून घेतला पाहिजे. शाहू महाराजांनी शिक्षण, रोजगार ,आरक्षण, महिला सक्षमीकरण, धर्मनिरपेक्षता यासाठी प्रयत्न केलेले आहेत .म्हणून त्यांचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी संघटन, शिक्षण, चळवळ या माध्यमातून सामाजिक सेवा उभी करावी लागेल. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी हा जो परिवर्तनाचा दिवा पेटवला आहे. तो बहुजन समाजांनी प्रत्येकाने हातात घ्यावा लागेल.तिच आमची ओळख आहे . आमचा गौरव आहे. आणि आमचं भविष्यही आहे. हे ओळखून बहुजन समाजाने शाहू महाराजांच्या विचारधारेचा धागा व्हावे.

********

किशोर कासारे
मंडणगड (दाभट)
८७६७४२५१८०

# सावधान!कोणत्याही नशेच्या आहारी जाणे घातकच.

दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो.सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे.कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो मग ती कोणतीही नशा असो. त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यंत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश,पाकिस्तान,नेपाळ,ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतार दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स,एमडी पकडली जाते. तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.मागीलवर्षी २२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली. सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगण्यात आले होते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही;उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात. सध्याच्या परिस्थितीत हॉटेल किंवा हुक्का पार्लर मधुन ड्रग्सचा पुरवठा होतो हेही लक्षात आले आहे. त्यामुळे अशा हॉटेलवर प्रशासनाकडुन कठोर कारवाई व्हायला हवी.अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही.यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत. देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. परंतु तस्करीच्या माध्यमातून अफीम, गांजा, भांग, कोकेन,हेरोइन,एमडी सारखे अंमली पदार्थ युवा पिढीपर्यंत वाममार्गाने पोहचवु त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम असामाजिक तत्व वेळोवेळी करीत असतात.परंतु आजचा युवावर्ग जागृक आहे त्यांनी प्रत्येक नशेली पदार्थांपासून सावध रहाले पाहिजे व त्याचा कडाडून विरोध करायला पाहिजे. देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंनजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा.त्यामुळे कोणतीही नशा म्हणजे आयुष्याचा शेवट ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला छल्ली व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे मृत्यूच्या रांगेतउभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील त्याचप्रमाणे आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया की नशेली वस्तूला टाटा–बाय–बाय करू या.

********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## नियमित न चुकता पिते 'या' पदार्थांपासून बनवलेला रस, जाणून घ्या तिच्या तारुण्याचे सिक्रेट

सगळ्यांचं अभिनेत्रींप्रमाणे सुंदर आणि चमकदार त्वचा हवी असते. बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा तिच्या फिटनेस आणि ब्युटीमुळे कायमचं चर्चेत असते. तिची फॅशनची नाहीतर तिचा फिटनेस सुद्धा अनेकांना प्रेरणा देणारा आहे. ती तिच्या सोशल मीडियावर नेहमीच काहींना काही शेअर करत असते. योगासने, वर्कआउट्स आणि आरोग्यदायी खाण्याचे उपाय ती कायमच तिच्या चाहत्यांसोबत शेअर करत असते. नुकताच तिने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्याने तिने ती दिवसभर नेमकं काय काय खाते, याबद्दलचा व्हिडिओ शेअर केला आहे. सकाळी उठल्यानंतर ती ' ज्यूस' घेते. आज आम्ही तुम्हाला ' ज्यूस' म्हणजे काय? ' ज्यूस' प्यायल्यामुळे आरोग्याला नेमके काय फायदे होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. काय आहे मलायका अरोराचं ज्यूस? ज्यूस म्हणजे – म्हणजे (सफरचंद), (बीट) आणि (गाजर). रोज सकाळी उठल्यानंतर मलायका अरोरा ज्यूसचे सेवन करते. हा ज्यूस मलायका सकाळी उठल्यानंतर १० वाजता उपाशीपोटी पिते. हा रस तयार करताना त्यात थोडस आलं सुद्धा टाकावे. यामुळे पदार्थांची चव वाढण्यासोबतच आरोग्याला सुद्धा अनेक फायदे होतात. यामध्ये अँटीऑक्सिडंट्स, फायबर्स, आणि जीवनसत्त्वे मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर नियमित रसाचे सेवन करावे. ज्यूसचे आरोग्यदायी फायदे: सकाळी उठल्यानंतर महिनाभर नियमित ज्यूसचे सेवन केल्यास शरीरासह आरोग्याला अनेक फायदे होतात. या रसाचे सेवन केल्यामुळे केवळ आरोग्यच नाहीतर त्वचासुद्धाअतिशय सुंदर आणि चमकदार दिसते. बीट आणि गाजरचे एकत्र मिश्रण तयार करून बनवलेला रस प्यायल्यामुळे शरीराची पचनक्रिया सुधारण्यास मदत होते.

# बहुजन समाजाचा उध्दारकर्ता – राजर्षी शाहू महाराज

राजर्षी शाहूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहे.

अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले.

त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना राजर्षी ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले–शाहू–आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. राजघराण्यातील ब्राह्मण पुरोहितांनी वैदिक स्तोत्रानुसार ब्राह्मणेतरांचे संस्कार करण्यास नकार दिल्याने शाहूंनी आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाला पाठिंबा देण्याबरोबरच मराठा समाजाच्या हक्कांसाठी प्रचार केला. त्यांनी पुजाऱ्यांना हटवून क्षात्रजगद्गुरू (क्षत्रियांचे विश्व गुरू) ही पदवी देऊन एका तरुण मराठाची ब्राह्मणेतरांचे धर्मगुरू म्हणून नियुक्ती करण्याचे धाडसी पाऊल उचलले. याला वेदोक्त वाद म्हणून ओळखले जाते. ते लवकरच ब्राह्मणेतर चळवळीचे नेते बनले आणि मराठ्यांना त्यांच्या झेंड्याखाली एकत्र केले

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १८९४ मध्ये संस्थानचा राज्यकारभार स्वीकारला. राज्यभर फिरून लोकांची परिस्थिती, गरजा व त्यांची दुःखे जाणून घेतली. सामान्य जनतेच्या भावना ओळखून त्यांचे दुःख निवारण करण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. अज्ञान, अंधश्रद्धा नि अस्पृश्यता या तीन व्याधी निपटून काढल्याखेरीज आपल्या प्रजेच्या विकासाच्या वाटा खुल्या होणार नाहीत, याची खूणगाठ बांधून महाराजांनी कामाला सुरुवात केली. गावोगावी शाळा काढल्या, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले, पुरोहित शाळा सुरू केल्या. त्याकाळी अस्पृश्यांना विद्येचा अधिकार तर नव्हताच; पण देवालये, चावड्या, सार्वजनिक पाणवठे आदी ठिकाणीही प्रवेश करण्यास त्यांना मनाई होती. महाराजांनी अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न स्वतःपासून केला. अस्पृश्य तरुणांना मोटार ड्रायव्हिंगच्या कोर्सला पाठवून आपल्या, महाराणी साहेबांच्या, चिरंजीव आक्कासाहेब व युवराज यांच्या गाडीवर नेमले. पट्टेवाले, शिपाई, डगलेवाले पोलीस, स्वतःचे शरीर–रक्षक अस्पृश्य नेमले. थोडेसे शिक्षण झालेल्यांना त्या मानाने कारकून, रजिस्ट्रारच्या जागा दिल्या. महात्मा फुले यांचा अस्पृश्योद्धाराचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्षात उतरविला.

खुद्द महाराजांच्या राजवाड्यातही ही सुधारणा अप्रिय वाटत होती. आपल्या राजवाड्यातील खासगी देवालयातील ब्राह्मण पुजाऱ्यास महाराजांनी काढून टाकले. पूजा–अर्चा, धार्मिक विधी प्रत्येक ठिकाणी मराठा पुरोहितांकडून चालू केले. राजवाड्यातही सर्वांना मराठा पुरोहितांकडून विधी करवून घ्यावेत, अशी सूचना केली. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते.शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल, शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले.

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करून समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे ही महत्त्वाची जबाबदारी राजर्षी शाहू महाराजांनी पार पडली त्यांच्या नेतृत्वाखालीच संपूर्ण कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळ उभी राहिली आणि ती नेटाने पुढे नेण्याची कामगिरी देखील पार पाडली गेली. पुढे या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली यासाठी त्यांनी शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारले. दलित पीडित उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला यामागे खरी प्रेरणा ही राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होते. बाबासाहेब आंबेडकरांना माणगावच्या परिषदेमध्ये दलितांचा नेता व भारतीय अग्रणी नेता म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावं असे आवाहनही महाराजांनी केले. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले.

कुशाग्र बुध्दिमत्ता, प्रभावित करणारं व्यक्तिमत्व, कलेविषयी अगाध प्रेम, थोर समाज सुधारक, बहुजन समाजाचा उध्दारकर्ता, कुशल प्रशासक, स्वच्छ प्रतिमा असलेला राज्यकर्ता म्हणुन कोल्हापूर संस्थानांचे राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांनी दैदिप्यमान राज्य कारभार केला. ज्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कर्तृत्वाची नोंद घेवूनच देशभर त्यांची जयंती साजरी होत आहे, त्या निमित्त त्यांना भावपूर्ण आदरांजली !

*********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

## पावसाळ्यात चेहऱ्यावर सतत पिंपल्स येत असतील तर 'अशी' घ्या त्वचेची काळजी, उद्भवणारी नाही त्वचेसंबंधित समस्या

राज्यासह संपूर्ण देशभरात मुसळधार पाऊस पडत आहे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये आरोग्यासह त्वचेची जास्त काळजी घ्यावी. कारण सतत पडणाऱ्या पावसामुळे त्वचेचे नुकसान होण्याची जास्त शक्यता असते. चेहऱ्यावर आलेले पिंपल्स, फोड, मुरूम कमी करण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. बदलेल्या वातावरणाचा परिणाम आरोग्यावर आणि चेहऱ्यावर लगेच दिसून येतो. त्वचा अधिक तेलकट आणि चिकट होऊन जाते. त्वचेवर अतिरिक्त तेल जमा झाल्यानंतर त्वचेच्या छिद्रांमध्ये तेल तसेच साचून राहते. यामुळे चेहऱ्यावर सतत पिंपल्स येतात. हे पिंपल्स फोडल्यानंतर त्वचा



अधिकच लाल होऊन जाते.

चेहऱ्यावर आलेले पिंपल्स बऱ्याचदा मोठे होतात. हे मोठे झालेले पिंपल्स फोडल्यामुळे त्वचेवर खाज येणे, रॅश येणे, त्वचा लाल होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांमध्ये त्वचा स्वच्छ करणे महत्वाचे आहे. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला पावसाळ्यात चेहऱ्यावर पिंपल्स येऊ नाय म्हणून त्वचेची कशी काळजी घ्यावी, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. त्वचा कायमच चमकदार आणि निरोगी ठेवण्यासाठी पाण्याने स्वच्छ करणे आवश्यक आहे.

पावसाळ्यात या पद्धतीने घ्या त्वचेची काळजी: पावसाळ्यातील वातावरणामुळे त्वचा अधिकच चिकट आणि तेलकट होऊन जाते. याशिवाय चेहऱ्यावर जास्त घाम आणि सेबम तयार होतात. यामुळे चेहऱ्याच्या रोम छिद्रांमध्ये धूळ, माती आणि घाणीचा चिकट थर जमा होतो. पावसाळ्यात वातावरणात जास्त आर्द्रता असते. यामुळे चेहरा चिकट, तेलकट होऊन जातो. यामुळे बॅक्टेरिया त्वचेवर सहज चिटकून जातात.त्यामुळे पावसाळ्यात चिकट झालेली त्वचा योग्य वेळी स्वच्छ करणे आवश्यक आहे. त्वचा फेशवॉशचा वापर करून स्वच्छ करून घ्यावी आणि त्यानंतर चेहऱ्यावर सूट होईल असे मॉइश्चरायझर लावावे. यामुळे त्वचा कायमच फ्रेश आणि निरोगी राहते.

चेहऱ्यावर आलेले पिंपल्स आणि मुरूम कमी करण्यासाठी आणि सारखे सॅलिसिलिक सिड वापरावे. यामुळे त्वचेवर आलेले पिंपल्स मोठे होत नाहीत. ऋतुनुसार त्वचा अधिक संवेदनशील होत जाते. त्यामुळे ऋतूनुसार स्किन केअर प्रॉडक्टमध्ये बदल करणे आवश्यक आहे. स्किन केअर प्रॉडक्टमध्ये बदल न केल्यामुळे त्वचा कायम तेलकट आणि चिकट राहते. याशिवाय तेलकट त्वचा असलेल्या महिलांनी तेल–मुक्त, जेलबेस आणि नॉन– कॉमेडोजेनिक असलेले सनस्क्रीन वापरावे. यामुळे त्वचेची छिद्र बंद होत नाही.

त्वचेवर धूळ, माती प्रदूषणामुळे घाण तशीच साचून राहते. यामुळे त्वचा अधिकच निस्तेज आणि कोरडी पडते. त्यांची त्वचा अधिकच तेलकट आहे, अशांनी दिवसभरातून दोनदा त्वचा पाण्याने स्वच्छ कारवी. यामुळे त्वचेवरील घाण निघून जाईल. याशिवाय त्वचा स्वच्छ करून झाल्यानंतर चेहऱ्यावर त्वचेला मॉइश्चरायझर लावावे. घाम आल्यानंतर किंवा त्वचा पुसताना जास्त जोरात घासू नये. यामुळे त्वचेवर रॅश किंवा पुरळ येण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे चेहरा नेहमीच हलक्या हाताने पुसावा.

# ऐश्वर्या राय बच्चन 'या' वेळी उठते; अभिनेत्री म्हणाली, माझा दिवस खूप

बॉलीवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन तिच्या अभिनयामुळे आणि सौंदर्यामुळे कायम चर्चेत असते. नुकतंच या अभिनेत्रीने तिच्या मॉर्निंग रुटिनबद्दल काही महत्त्वाच्या गोष्टी शेअर केल्या आहेत.सगळ्या जगासाठी दिवसात २४ तास असतात, पण आम्ही २४ तासांत ४८ तासांचं काम करायचा प्रयत्न करतो. मला वाटतं आयुष्यात इतकं काही चालू असतं की एक ठराविक पॅटर्न सांगणं शक्यच नाही. पण, एक गोष्ट नक्की आहे – माझा दिवस खूप लवकर सुरू होतो. माझा दिवस किमान सकाळी ५.३० वाजता सुरू होतो, असं तिनं हार्पर बझारला सांगितलं.



सकाळी लवकर उठण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे असतात. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई येथील गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्ट डॉ. दत्तात्रय सोलंकी यांच्याशी केलेल्या संवादात ने हे फायदे काय आहेत ते जाणून घेतले.

झोपेची गुणवत्ता सुधारते : नैसर्गिक प्रकाश आणि अंधाराच्या चक्रानुसार झोप घेणे तुमची झोप खोल आणि आरामदायक बनवते. लवकर झोपल्याने शरीराला आणि खोल झोपेच्या टप्प्यांमध्ये जास्त वेळ मिळतो, जे शरीर आणि मनाच्या पुनर्बलासाठी खूप महत्त्वाचे असते. ऊर्जा पातळी चांगली राहते : लवकर झोपल्याने आणि लवकर उठल्याने दिवसभर चांगली ऊर्जा मिळते. शरीराला पुरेसा आराम मिळतो, ज्यामुळे विशेषतः सकाळच्या वेळी लक्ष केंद्रित ठेवता येतं आणि सतर्क राहता येतं. एक चूक अन् खेळ खल्लास! किल्ल्यावर तरुणाची जीवघेणी स्टंटबाजी; कड्याला पकडून थेट खोल दरीत लटकला अन तळवशे तळीरश्र

रीलच्या नादात जीव, धबधब्यावर व्हिडिओ करता करता केली मोठी चूक; दोघींचा पाय घसरला अन.; पुढे जे घडलं ते पाहून काळजात होईल धस्स, तळवशे तळीरश्र

कर्म फिरून येतंच शेतात आलेल्या सापाला तरुणानं ट्रॅक्टरच्या चाकाखाली अक्षरश: चिरडून टाकलं; सापाचा तखऊग्ज पाहून धक्का बसेल हार्मोन्सचं संतुलन सुधारतं : मेलाटोनिन हा झोपेचा हार्मोन संध्याकाळी लवकर वाढतो, त्यामुळे लवकर झोप लागते. त्याचबरोबर, सकाळी कॉर्टिसोल हार्मोनचं चांगलं नियंत्रण राहतं, ज्यामुळे उठल्यावर फ्रेश आणि जागरूक वाटतं. मेटाबॉलिझम (पचनक्रिया) सुधारते : लवकर झोपल्याने शरीराची पचनक्रिया नीट होते आणि रात्री उशिरा लागणारी भूक कमी होते, ज्यामुळे अन्न पचवायला अडचण येत नाही.

लवकर झोपल्यावर शरीर अन्न योग्यरित्या पचवून त्याचा उपयोग चांगल्या प्रकारे करू शकतं. असं रुटिन कसं सेट करावं? डॉ. सोलंकी यांनी सांगितलं की, रोज झोपायची आणि उठायची वेळ १५ ते ३० मिनिटांनी लवकर करत जा, जोपर्यंत तुम्ही तुमच्या उद्दिष्ट वेळेपर्यंत पोहोचत नाही. सकाळी लवकर उठून व्यायाम करायची कल्पना खूप चांगली वाटते. पण, जेव्हा आपण अलार्मनुसार उठू शकत नाही, तेव्हा आपली उत्सुकता कमी होते. यावरचा चांगला उपाय म्हणजे अलार्मची वेळ रोज १५ मिनिटांनी लवकर ठेवणे. हे एक आठवडा करा आणि मग पुढे अजून वेळ लवकर करा. अशाने बदल अचानक वाटत नाही आणि शरीर हळूहळू नव्या रुटीनला जुळवून घेतं, असं त्यांनी सांगितलं. त्यांनी हेही सांगितलं की दररोज, अगदी वीकेंडलाही, उठायची वेळ एकसारखी ठेवा – यामुळे शरीराचं आतलं घड्याळ नीट चालू राहतं. झोपण्याच्या आधी कॅफिन, जड जेवण किंवा व्यायाम टाळा. त्याऐवजी पुस्तक वाचा, ध्यान करा किंवा हलकं स्ट्रेचिंग करा, अशा शांत करणाऱ्या गोष्टी करा, असं त्यांनी सांगितलं. अनेक वैद्यकीय अभ्यास सांगतात की, उठल्याबरोबर चहा किंवा कॉफी घेणं टाळावं, कारण तुम्हाला थोडं रिलॅक्स होणं गरजेच आहे.

आपल्या शरीराला समजून घेणं आणि त्याच्या गरजा ऐकणं महत्त्वाचं आहे. जर कॉफीमुळे फ्रेश वाटत असेल, तर ठीक आहे – ती घ्या. रात्री झोपायच्या आधी शांत आणि आरामदायक सवयी लावा, ज्यामुळे शरीराला झोपेची वेळ झाली आहे हे समजतं. यामध्ये लाईट मंद करणे, सौम्य संगीत ऐकणे किंवा गरम पाण्याने अंघोळ करणे यांचा समावेश होऊ शकतो. तज्ज्ञांनी सांगितलं की, दिवसभरात विशेषतः सकाळी नैसर्गिक प्रकाशात थोडा वेळ घालवा. यामुळे शरीराचं नैसर्गिक घड्याळ सेट होतं, ज्यामुळे लवकर झोप येते आणि लवकर उठता येतं.

# मानसिक आरोग्य कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करा – प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील

लातूर, दि. २५ : मानसिक आरोग्य कायदा २०१७ अंतर्गत मानसिक रुग्णांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी मानसिक आरोग्य कायद्याची प्रभावी अमंलबजावणी करण्यावर भर देण्याच्या सूचना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील यांनी दिल्या. जिल्हा व सत्र न्यायालय येथे आयोजित लातूर विभागाच्या मानसिक आरोग्य आढावा मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी मानसिक आरोग्य आढावा मंडळाचे सदस्य सचिव डॉ. एस. बी. ढगे, नायब तहसीलदार एस. एच. देशमुख, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शितल तळीखेडकर, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, अशासकीय सदस्य आर. एम. क्षीरसागर आदी उपस्थित होते.



मानसिक आरोग्य कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने राज्यामध्ये एकूण ८ विभागामध्ये मानसिक आरोग्य आढावा मंडळाची स्थापना केलेली आहे. त्याअनुषंगाने लातूर विभागाच्या मानसिक आरोग्य आढावा मंडळाच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सदस्य सचिव डॉ. ढगे यांनी मानसिक आरोग्य आढावा मंडळाची कर्तव्ये व जबाबदारी याबाबत माहिती दिली. यावेळी मंडळाच्या कार्यपध्दतीबद्दल आढावा घेण्यात आला. मानसिक आरोग्याबाबत समाजामध्ये जागरुकता येणे गरजेचे असुन मानसिक रुग्णांना त्यांचे हक्क मिळावेत, यादृष्टीने मानसिक आरोग्य कायदा – २०१७ च्या कायदयाची यशस्वी अंमलबजावणी हे मंडळ करील, अशी अपेक्षा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

# डॉ. कैलास गायकवाड यांची नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त पदी नियुक्ती



नवी मुंबई / के. एच. हनवते :– नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त पदी डॉ. कैलास गायकवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल वंचित बहुजन आघाडी बेलापूर तालुक्याच्या वतीने भारतीय संविधानाचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी बेलापूर तालुका अध्यक्ष : सुनील भोले, महासचिव : गौतम चव्हाण, उपाध्यक्ष : कल्याणराव हनवते.

# आरोग्य विद्यापीठातर्फे दि. २७ जून रोजी नांदेड येथे कुलगुरु कट्ट्याचे आयोजन

नाशिक : (दि.२५) – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे शुक्रवार, दि. २७ जून २०२५ रोजी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड येथे 'कुलगुरु कट्टा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी समजून त्यावर योग्य उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून मा. कुलगुरु महोदया यांच्या संकल्पनेतुन सुरु करण्यात आलेला 'कुलगुरु कट्टा' कार्यक्रमात मा. कुलगुरु विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत यापूर्वी विद्यापीठातर्फे नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सोलापूर, लातूर, मुंबई, नागपूर, अहिल्यानगर, कोल्हापूर आदी ठिकाणी 'कुलगुरु कट्टा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. नांदेड येथे आयोजित कार्यक्रमास मा. कुलगुरु महोदया यांच्या समवेत विद्यापीठाचे मा. प्रति–कुलगुरु डॉ.मिलिंद निकुंभ, कुलसिचव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, महाविद्यालयाचे अधिष्ठाता, प्राचार्य आदी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. नांदेड जिल्हयातील वजिराबाद येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाच्या सभागृहात दि. २७ जून २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता 'कुलगुरु कट्टा' कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

# सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया सुरु

लातूर, दि. २५ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यात मुलांची १३ आणि मुलींची १२ अशी एकूण २५ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांची सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होत असून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी या लिंकचा वापर करून विद्यार्थी वसतिगृहासाठी प्रवेश अर्ज भरू शकतात.

प्रवेश अर्ज भरण्यासाठी जिल्ह्यात इयत्ता आठवी व अकरावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या, तसेच बिगर व्यावसायिक पदवी, पदविका प्रथम वर्षात, पदव्युत्तर प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरता येईल. तरी शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी वरील लिंकचा वापर करून, तसेच स्थानिक गृहप्रमुख अथवा गृहपाल यांच्याशी संपर्क साधून प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन प्र. समाज कल्याण सहायक आयुक्त विलास केंद्रे यांनी केले आहे.

# वीरशैव लिंगायत समाजाचा २८ सप्टेंबर २०२५ रोजी उदगीर येथे राज्यव्यापी वधू–वर परिचय मेळावा

लातूर : लिंगायत महासंघ शाखा उदगीरच्यावतीने प्रतीवर्षाप्रमाणे याहीवर्षी वीरशैव लिंगायत समाजाचा सातवा राज्यव्यापी वधू–वर परिचय मेळावा रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी उदगीर येथे आयोजित करण्यात आला असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले. उदगीर शहरात गेल्या सात वर्षापासून लिंगायत महासंघाच्यावतीने राज्यव्यापी वीरशैव लिंगायत वधू–वर परिचय मेळाव्याचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येते. या वधू–वर मेळाव्यात लिंगायत समाजातील सर्व पोटजातीचा, पुनर्विवाहोच्छुक, विधवा–विधुर, उच्चशिक्षीतांपासून सामान्य शिक्षण घेतलेले वधू–वर भाग घेत असतात. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा व आंध्रप्रदेशातून वधू–वर व पालक या मेळाव्याला उपस्थित राहतात.

मंगळवार दिनांक २४ जून २०२५ रोजी उदगीर येथे लिंगायत महासंघाची बैठक लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत २८ सप्टेंबर रोजी भव्य वधू–वर मेळावा घेण्याचे ठरले. या बैठकीला लिंगायत महासंघाचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत शिरसे, शहराध्यक्ष भिमाशंकर शेळके, शहर संघटक संजय शिवशेट्टे, तालुका संघटक शिरीष रोडगे, संघटक अशोक कडोळे, राहुल तोंडारे, अशोक शेटकार, लक्ष्मण भालके, सुर्यकांत शिरसे, बापूराव शेटकार, कालिदास शिरसे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले.

# आणीबाणीच्या काळातील घटनांवर आधारित प्रदर्शनाचे लातूर येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर, दि. २५ : देशात २५ जून १९७५ रोजी लागू झालेल्या आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनाद्वारे आणीबाणीच्या काळातील आव्हानात्मक परिस्थितीत लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांना उजाळा देण्यात आला आहे.




जिल्हाधिकारी कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील कक्षात आयोजित या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, अहिल्या गाठाळ, गणेश पवार, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, आणीबाणीच्या काळात बंदिवास भोगलेले माजी आमदार मनोहर पटवारी, प्रदीप पाटील खंडापूरकर, सुभाष निंबाळकर, अनिल अंदोरीकर, अशोक मठपती उपस्थित होते.

आणीबाणीचा कालखंड हा भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून नव्या पिढीला त्या काळातील घटनांचा इतिहास आणि लोकशाहीच्या संरक्षणाचे महत्त्व समजण्यास मदत होईल, असे मत प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी व्यक्त केले.

लातूर जिल्हा माहिती कार्यालयामार्फत आणीबाणीच्या ५०व्या वर्षपूर्तीनिमित्त हे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात आणीबाणीच्या काळातील महत्त्वाच्या घटना आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी केलेल्या संघर्षाचा इतिहास प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आणीबाणीशी संबंधित विविध घटना, घडामोडी, त्या काळात लोकशाहीसाठी लढणाऱ्या मान्यवरांची छायाचित्रे, तसेच संक्षिप्त पण माहितीपूर्ण मजकूर आणि माहितीफलकांचा समावेश आहे.

या प्रदर्शनात आणीबाणीच्या कालावधीतील संपूर्ण संघर्षाचा संक्षिप्त परिचय आणि त्यातील महत्त्वाचे टप्पे यांची मांडणी करण्यात आली आहे. माहितीपूर्ण मजकूर आणि ऐतिहासिक छायाचित्रांमुळे नागरिकांना त्या काळातील आव्हानात्मक परिस्थिती आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती मिळेल. तसेच, आणीबाणीविषयी चित्रफितीचाही या प्रदर्शनात समावेश आहे.

आणीबाणीत बंदिवास भोगलेल्या व्यक्ती, त्यांचे कुटुंबीय आणि नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट दिली. हे प्रदर्शन २७ जून २०२५ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची गोजमगुंडे निवास्थानी भेट

लातूर/प्रतिनिधी : महाराष्ट्राचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी माजी नगराध्यक्ष तथा सिध्देश्वर देवस्थान व लातूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी गोजमगुंडे परिवाराच्या वतीने त्यांचा हृदयपूर्वक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ना. पाटील यांनी विविध विषयांवर गोजमगुंडे परिवारासोबत मनमोकळा संवाद साधला.



सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे लातूर दौजयावर असताना त्यांनी माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्या मंठाळे नगर येथील अस्मिता निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान ना. पाटील यांनी गोजमगुंडे परिवारासोबत असलेल्या कौटूंबिक संबंधांना उजाळा दिला. यामध्ये तत्कालिन राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांच्या कार्यकाळात नगराध्यक्ष व बाजार समिती सभापती म्हणून आपण कार्य केले असल्यामुळे बाळासाहेब जाधव यांच्यासोबत अनेक राजकीय कार्यक्रमांना व विविध बैठकींना उपस्थित राहण्याचा योग आला असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी सांगितले. यानिमित्ताने आपल्या परिवाराशी अधिकचा स्नेह जोडला गेला असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर लातूर शहरासह जिल्ह्याच्या राजकीय परिस्थितीबाबत विस्तृत चर्चाही केली. तसेच विविध प्रश्नांबाबत गोजमगुंडे परिवाराकडून मतेही जाणून घेतली. याप्रसंगी ना. पाटील यांनी सहकार क्षेत्रातील अनेक बाबींवर चर्चा करून लातूरसह मराठवाड्यातील सहकार क्षेत्राला अधिक प्रगत आणि विकसित करण्यासाठी कोणत्या कोणत्या उपाय योजना होऊ शकतात याबाबतही चर्चा केली. तसेच जिल्ह्याच्या विकासाबाबत काय करता येईल याबाबतही गोजमगुंडे परिवाराकडून माहिती घेतली.यावेळी ना. बाबासाहेब पाटील यांचा गोजमगुंडे परिवाराच्या वतीने माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे व विरांश गोजमगुंडे यांच्या तीन पिढीच्या शिलेदारांनी सत्कार केला.

# व्यक्तिगत संपर्कातून लढा उभारू शकतो – पद्मभूषण डॉ.अशोक काका कुकडे आणीबाणीच्या काळ्याकुट्ट इतिहासाची उलगडली पाने.

लातूर दि.२५/०६/२०२५ आणीबाणीचा कठीण काळ देशासाठी अतिशय बिकट होता. हा काळ मी केवळ अनुभवला नव्हे तर जगलो असल्याचे सांगून पद्मभूषण डॉ.अशोक काका कुकडे यांनी या आणीबाणी विरोधात लढा उभारताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व्यक्तिगत संपर्काचा अतिशय मोलाचा वाटा होता. या संपर्कातूनच आणीबाणीच्या विरोधात लढा उभारून हि आणीबाणी संपुष्टात आणली. या आणीबाणीचा इतिहास विकसित भारताची संकल्पना मांडत असताना सर्वांना ज्ञात असणे आवश्यक असून याकरिता सध्याच्या व भावी पिढीने आणीबाणी विषयी साहित्याचे वाचन करावे, असे आवाहन डॉ.अशोक काका कुकडे यांनी केले आहे.

लातूर शहर जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने आणीबाणी दिवसा निमीत्त जे.एस.पी.एम. शैक्षणिक संकुलात पद्मभूषण डॉ.अशोक काका कुकडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, सरचिटणीस प्रवीण सावंत, अ‍ॅड.प्रदिप मोरे, सौ.मीना भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतमाता, पंडित दिनदयाळ उपाध्याय, डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.




आणीबाणीच्या काळात २१ महिने तुरुंगवास भोगलेले पद्मभूषण डॉ. अशोक काका कुकडे यांनी आणीबाणीच्या काळ्याकुट्ट इतिहासाची पाने उलगडताना आणीबाणीचा काळ म्हणजे लोकशाहीची हत्या करणारा काळ होता, असे सांगितले. या काळात देशाच्या राज्य घटनेला व संविधानाला बाजूला सारत व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणण्यात आली होती. विशेष म्हणजे या काळात संपूर्ण देशच तुरुंगसमान वाटत होता, असे सांगून या काळात इंदिरा गांधी यांच्या सरकार विरोधात किंवा त्यांच्या विचाराच्या विरोधात आंदोलने किंवा लढा उभारणाऱ्यांना कोणताही गुन्हा नसताना तुरुंगात टाकले जात होते. याकरीता मिसा कायदा अस्तित्वात आणून त्या अंतर्गत अटक झालेल्यांना न्यायालयासमोर उभे केले जात नव्हते. विशेष म्हणजे किती काळापर्यंत त्यांना तुरुंगात डांबायचे हे सुद्धा इंदिरा गांधी यांचे सरकारच ठरवत असल्याचे डॉ.कुकडे यांनी सांगीतले. याच काळात सामाजिक व राजकीय असणाऱ्या जवळपास २२ संघटनांवर बंदी घालण्यात आली होती. यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचाही समावेश होता. विशेष म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कधीच इंदिरा गांधी यांच्या विरोधात टिका अथवा आंदोलन केले नव्हते. तरीही ही बंदी आणून संघाच्या सरसंघचालकांसह हजारो स्वयंसेवकांना तुरुंगात डांबले होते असे डॉ.कुकडे यांनी सांगितले. आणीबाणीच्या काळात वर्तमानपत्रांवर सुद्धा सेन्सॉरशीप आणून वर्तमानपत्रात काय छापायचे आणि काय नाही याचा अधिकारही सरकारने आपल्याकडे घेतला होता, असे सांगून डॉ.कुकडे यांनी यामुळे देशात कुठे काय चालू आहे याची माहिती जनतेला मिळत नव्हती. आणीबाणीचा काळ सुरुवातीला काही जणांना चांगला वाटला मात्र यानंतर याचे दुष्परिणाम समोर येऊ लागले आणि हळूहळू आणीबाणीच्या विरोधात लढा उभारण्यास सुरुवात झाली. हा लढा उभारताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटनेचा आणि व्यक्तिगत संपर्काचा मोठा फायदा झाला असे सांगून यामुळेच आणीबाणीचा लढा संपूर्ण देशभरात अधिक तीव्र झाला असल्याचे डॉ.कुकडे यांनी सांगितले. लोकशाहीच्या तत्वाला तिलांजली देणाऱ्या या आणीबाणीच्या काळाचा जगभरातून तीव्र निषेध होऊ लागला होता. आंदोलनास बळ मिळत आहे असे लक्षात आल्या नंतर इंदिरा गांधी यांनी नमते घेत निवडणुका जाहीर केल्या. या निवडणुकांमध्ये इंदिरा गांधी यांच्या सरकारचा दारूण पराभव झाला आणि आणीबाणीचा काळ संपुष्टात आला, असे सांगून डॉ.अशोक काका कुकडे यांनी या आणीबाणीच्या काळाने मात्र देशातील जनतेला बरेच काही शिकवले आणि यातून राजकीय पक्षांनी बोध घेतला असे सांगितले. या आणीबाणीच्या लढ्यामुळे व्यक्तिगत संपर्कातून लढा उभारू शकतो हे सिद्ध झाले असे सांगून हा इतिहास काळा असला तरी तो विकसित भारत घडवण्यात ज्यांचा वाटा आहे त्यांना ज्ञात असणे आवश्यक असल्याचे डॉ. अशोक काका कुकडे यांनी स्पष्ट केले.याकरीता विधार्थ्यांनी व तरुणांनी आणीबाणी विषयी लिखाण केलेल्या साहित्याचे वाचन करावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी करताना सांगीतले की आणीबाणीचा काळ म्हणजे नेमके काय, या काळात लोकशाहीचा खुन कसा झाला याची माहिती देशातील प्रत्येकाला आणि विशेषतः पुढील पिढीस होणे आवश्यक असल्याचे सांगितले. यामुळेच या कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण देशभरात भाजपच्या वतीने करण्यात येत असून असा आणीबाणीचा काळ पुन्हा कोणत्याच देशातील जनतेच्या नशिबी येऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ.रागिणी यादव यांनी केले. या कार्यक्रमास सरचिटणीस अ‍ॅड.दिग्विजय काथवटे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य मधुसुदन पारीख, मंडल अध्यक्ष विशाल हवा पाटील, काकासाहेब चौगुले, माजी नगरसेविका श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, संजय गीर, संतोष ठाकूर, भरत भोसले, शीतल पाटील, सीमा करपे, हेमा येळे, अजय भूमकर, रविशंकर लवटे, शशिकांत हांडे, किशन बडगीरे, उदय देशपांडे, मुन्ना हाश्मी, व्यंकटेश हंगरगे, संतोष इगवे, वैभव वनारसे, अरुण जाधव, मंदार कुलकर्णी, पंकज देशपांडे, सागर घोडके, संतोष तिवारी, प्रमोद गुडे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व विधार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पहिलीपासून मराठीच शिकवावी, तर हिंदी; अजित पवारांनी स्पष्ट केली भूमिका

राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा विषयाच्या सक्तीवरुन वातावरण तापले आहे. हिंदी सक्तीच्या वाढत्या विरोधानंतर राज्य शासनाने एक पाऊल मागे घेतले आहे. त्रिभाषा सूत्रासंदर्भात साहित्यिक, भाषातज्ज्ञ आणि राजकीय नेत्यांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील हिंदी सक्तीच्या निर्णयावरून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.



अजित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधताना इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत हिंदी सक्ती नको, अशी भूमिका मांडली. कोणत्याही भाषेला विरोध नाही. त्या दोन्ही भाषा लोकांना येतात. पहिलीपासून विद्यार्थी जेव्हा मराठी लिहायला आणि वाचायला शिकतो तेव्हापासून त्या विद्यार्थ्याली हिंदी लिहिता आणि वाचते येते. कारण त्या सारख्या आहेत. पण बोलण्यासंदर्भात पाचवीपासून शिक्षण दिले पाहिजे. असे अनेक तज्ज्ञांचे देखील मत आहे. पाचवीपासून हिंदी सक्तीची करावी. पहिल्याच वर्गात विद्यार्थ्यांवर वेगवेगळ्या प्रकारचं ओझं लादणं हे योग्य नाही,' असे मत अजित पवार यांनी व्यक्त केले. दरम्यान, शाळेत पहिल्या वर्गापासून तिसरी भाषा म्हणून हिंदीचा पर्याय आणि तीही मागच्या दाराने सक्ती केल्याचा आरोप केला जात आहे. राज्य शासनाने विद्यार्थ्यांना हिंदी भाषेची सक्ती केल्याने विविध राजकीय, सामाजिक, शिक्षक संघटनांकडून टीकेचा भडिमार होत आहे. हा विद्यार्थ्यांवर हिंदी भाषा लादण्याचाच प्रयत्न असून, त्याऐवजी मराठी भाषेचे महत्त्व वाढविण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील पहिलीपासून हिंदी सक्तीला विरोध केला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE